# जागतिक कॉमन्स सप्ताहाचे माध्यमातून जनजागृती

**विदर्भ कल्याण/ यवतमाळ**



जिल्ह्यातील सामूहिक वन हक्क प्राप्त ग्रामसभा मध्ये फाउंडेशन फॉर इकॉलॉजिकल सिक्युरीटी, यवतमाळ आणि पार्टनर संस्था आयोजित जागतिक कॉमन्स सप्ताह चे आयोजन करण्यात आले. या कॉमन्स सप्ताह मध्ये जगातील वेगवेगळ्या राज्यातून विविध समुदायातील प्रतिनिधि यांची ऑनलाइन बैठक आयोजित केली होती.

ऑनलाइन संमेलन आयोजित करण्यामागचा उद्देश देशातील सामुदायिक व सामूहिक साधन संपत्ति वर काम करणाऱ्या विविध घटकाना एकत्र आणणे आहे. या वेळी FES यवतमाळचे जिल्हा समन्वयक गोविंद पेडणेकर यांनी माहिती दिली. यावेळी विकेश आणि आनंद यांनी सांस्कृतिक आणि पारंपरिक ज्ञानपद्धती पासून ते डिजिटल आणि इंटरनेट आधारित माहिती दिली. या माध्यमातून सामूहिक वन हक्क धारक यांना प्राप्त अधिकार आणि हक्क विषयी जाणीव जागृती होत आहे. या करिता कार्यरत सर्व फील्ड ट्रेनर आणि मास्टर ट्रेनर सर्व ग्रामसभा मध्ये कॉमन्स वीक साजरा करणे साठी प्रयत्न करीत आहे. यवतमाळ जिल्ह्यात जागतिक कॉमन्स सप्ताहाचे माध्यमातून सामूहिक वन हक्क धारक यांचे करिता जाणीव जागृती कार्यक्रम मधे घाटंजी तालुक्यातील शाळा महाविद्यालय यांचा मोठ्या प्रमाणात सहभाग आहे. ज्यात शि. प्र. म. विज्ञान व गिलानी कला वाणिज्य महविद्यालय, शि.प्र.म. कन्या शाळा, जिजाऊ आश्रम शाळा खापरी, जि प शाळा शिरोली जि प शाळा रामपूर, जि प शाळा घोटी, बाबासाहेब विद्यालय शिरोली,आदी शाळेचा शिक्षक शिक्षकेत्तर कर्मचारी सदस्य विद्यार्थी यांचा सहभाग होता.